महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे त्रैमासिक मुखपत्र

रजि. नं. महा./285/98/ नागपूर

# पक्षीमित्र

■ वर्ष नववे ■ अंक १ ला ■ संपादक : दिगंबर गाडगीळ ■ १ ऑक्टोबर २०१८ ■ पाने-१६

## संपादक

**श्री. दिगंबर गाडगीळ**
३९, आनंदवन कॉलनी, ऑफ कॉलेज रोड, नाशिक – ४२२००५
स्थिरभाष : (०२५३) २५७७९६८ चलभाष : ९८८१०७९७११
**सहाय्यक संपादक**
**श्री. अनिल माळी,** नाशिक / Email: anilrmali@yahoo.co.in
**श्री. किरण मोरे,** अमरावती / Email: kiranmore1983@gmail.com

**कार्यकारिणी**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | – | **डॉ. जयंत वडतकर,** अमरावती<br>**मो. ९८२२८७५७७३** |
| कार्याध्यक्ष | – | **डॉ. राजू कसंबे,** ठाणे<br>**मो. ९००४९२४७३१** |
| संघटक | – | **प्रा. डॉ. सुधाकर कुन्हाडे,** अहमदनगर<br>**मो. ९८५०२९१३२४** |
| कार्यवाह | – | **प्रा. डॉ. गजानन वाघ,** अमरावती<br>**मो. ९८२२२०४०७०** |
| सहकार्यवाह | – | **श्री. शरद आपटे,** सांगली<br>**मो. ९८९०३८४४००** |
| सहसंघटक | – | **श्री. अनिल माळी,** नाशिक<br>**मो. ९८५०८१८६४४** |
| सदस्य | – | **प्रा. निनाद शहा,** सोलापूर<br>**मो. ९४२२४५९९१५** |
| सदस्य | – | **श्री. किशोर गठडी,** औरंगाबाद<br>**मो. ९४२२२०२६२८** |
| सदस्य | – | **श्री. रोहन भाटे,** कराड (सातारा)<br>**मो. ९४२२००४८००** |
| सदस्य | – | **श्री. सचिन मेन,** पालघर<br>**मो. ९९७०५५५७५०** |
| सदस्य | – | **श्री. अनिल महाजन,** वरणगाव–जळगाव<br>**मो. ८८०६१९८०४०** |

**विभागवार समन्वयक**

| | | |
|---|---|---|
| विदर्भ | – | **श्री. दिलीप विरखडे,** वर्धा<br>**मो. ७७७५८८३८६१** |
| मराठवाडा | – | **श्री. रत्नाकर निकम,** अंबाजोगाई<br>**मो. ९६२३४२००६२** |
| उत्तर महाराष्ट्र | – | **श्री. अभय उजागरे,** जळगाव<br>**मो. ९४२३७७३९७९** |
| पश्चिम महाराष्ट्र | – | **श्री. अजित उर्फ पापा पाटील,** सांगली<br>**मो. ९४२२०४१०५९** |
| कोकण | – | **प्रा. धीरेंद्र होळीकर,** सावंतवाडी<br>**मो. ९४२२४३५८०१** |


# संपादकीय

## महाराष्ट्रातील माळढोक अस्तंगत ?

१९८४ सालचे पक्षीमित्र संमेलन सोलापूर येथे झाले होते. साहजिकच नान्नजला माळढोक दर्शनाचा योग होता. त्यावेळी मोजून १४ माळढोक दिसले होते. त्यानंतर बी. एस. कुलकर्णींशी बोलताना तुम्ही केव्हाही या, माळढोक दाखविण्याची जबाबदारी माझी ते छातीठोकपणे म्हणाले होते. याचा अर्थ माळढोकांची संख्या बऱ्यापैकी होती. त्यानंतर मी तीनदा तरी नान्नजला गेलो होतो. प्रत्येक भेटीत माळढोकांची संख्या कमी होत होती.

एकदा रेहकुरीला भेट देऊन परत येत असताना नगरच्या वनसंरक्षक कार्यालयात थांबलो होतो. एवढ्यात त्यांचा एक कर्मचारी जवळच्या व्हेईकल रिसर्च सेंटरवर माळढोक आल्याची खबर घेऊन आला. आम्ही लगेच तिकडे गेलो. स्टेशनच्या छपराच्या खालच्या कैच्यांवर तीन माळढोक बसलेले होते.

त्यानंतर सात–आठ वर्षांपूर्वी नाशिकजवळच्या HAL कारखान्याच्या संरक्षक क्षेत्रात माळढोक दिसले होते. अलीकडेच महाराष्ट्रात केवळ एक माळढोक दिस्त असल्याचे वाचनात आले. याचा अर्थ महाराष्ट्रातील माळढोक संपले असाच होतो.

मुळात माळढोक अभयारण्यासाठी ८४९६ चौ. कि. मी. चा प्रदेश प्रस्तावित होता. पण त्याची अंमलबजावणी न झाल्याने स्थानिकांचा विरोध होता. परिणामी ते क्षेत्र १२२२ हेक्टर एवढे कमी करण्यात आले होते. मर्यादित क्षेत्रावर वन खात्याकडून परिणामकारक देखरेख होऊन माळढोक संवर्धन होईल अशी अपेक्षा होती. पण झाले भलतेच. माळढोकची संख्या हळूहळू कमी होत जाऊन तो आता नामशेष झाला आहे असे म्हणण्याची वेळ आली आहे.

पक्षी अधिवास कमी होणे, त्याचा ऱ्हास होणे, जंतुनाशकांचा वापर इ. अनेक कारणांमुळे माळढोकच काय इतर पक्ष्यांचीही संख्या घटते आहे. त्यामुळे माळढोकाच्या पाठोपाठ काही इतर पक्षीदेखील अस्तंगत होणार काय अशी भीती आहे. योग्य त्या उपाययोजना होतील व ती भीती खरी न ठरो एवढेच म्हणता येईल.

– दिगंबर गाडगीळ
संपादक

# अध्यक्षीय

संस्थेचे कामकाज अमरावती येथून सुरळीतपणे सुरू झाले असून पक्षीमित्रचा जुलै मध्ये प्रकाशित अंक अमरावतीवरून प्रथमच वितरित झाला. यापूर्वीच्या अनुभवानुसार जवळपास २५-३० अंक पत्ता न सापडल्यामुळे परत आलेत. वेगवेगळ्या माध्यमांद्वारे आवाहन करून जवळपास १४ सभासदांनी आपले नवीन पत्ते कळविलेत. जवळपास ११०० सभासदांपैकी ३० अंक परत आलेत, ही संख्या तशी किरकोळ आहे. परंतु अंक यापेक्षा खूप जास्त लोकांना मिळत नाहीत हे खरे आहे. अनेक ठिकाणी डाक कार्यालयातून वितरणाचे प्रश्न आहेत, त्यामुळे ज्यांना अंक मिळत नाही त्यांनी कृपया नजीकच्या डाक कार्यालयात चौकशी करावी. तसेच सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपला बदललेला पत्ता, इ-मेल इ. कळविण्यात यावा.

आपल्याला ज्ञात असेलच की, महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे मागील वर्षापासून ५ ते १२ नोव्हेंबर दरम्यान पक्षी सप्ताहाचे आयोजन केले जाते. या वर्षी सप्ताहाचे दुसरे वर्ष. नोव्हेंबर ५ हा ख्यातनाम पक्षीतज्ज्ञ मा. मारोती चितमपल्ली यांचा जन्मदिन आणि १२ नोव्हेंबर ही थोर पक्षी अभ्यासक डॉ. सालीम अली यांची जयंती. या दोन व्यक्तींचे पक्षी अभ्यासात मोठे योगदान आहे. यांच्या प्रयत्नाने पक्षी निरीक्षण आणि पर्यायाने पक्ष्यांचे संवर्धन करण्याची मोहीम तळागाळापर्यंत पोहोचली. दोन व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी आणि पक्षी-प्रेम, पक्षी-अभ्यास यांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी यावर्षी सुद्धा हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून महाराष्ट्रभर साजरा करू या. पक्षीविषयक कार्य करणाऱ्या व महाराष्ट्र पक्षीमित्र समवेत जुळलेल्या अनेक संस्था, तसेच सभासदांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर पक्षीनिरीक्षण, पक्षीअभ्यास, छायाचित्रण, चर्चासत्रे, व्याख्याने, स्लाईड शोज, चित्रकला स्पर्धा, छायाचित्र प्रदर्शनी, पक्षीगणना असे विविध कार्यक्रम करण्यास हातभार लावू या. आणि हो, आपण घेतलेल्या कार्यक्रमांबाबतची माहिती महाराष्ट्र पक्षीमित्रकडे व पक्षीमित्र अंकासाठी पाठविण्याससुद्ध विसरू नका.

यावर्षी दुसरे अखिल भारतीय व ३२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन दि. २३-२४ नोव्हेंबर २०१८ दरम्यान कराड येथे, कराड जिमखाना या संस्थेच्या यजमानपदाखाली होत आहे. पहिले अखिल भारतीय संमेलन इ. स. १९९८ साली आजपासून तब्बल २० वर्षांपूर्वी याच संस्थेने कराड येथे आयोजित केले होते. त्यानंतर पुन्हा अखिल भारतीय स्तरावर संमेलन आयोजनाचे शिवधनुष्य या संस्थेने उचललेले आहे. या संमेलनासाठी राज्याबाहेरील पक्षी अभ्यासक तथा तज्ज्ञ सहभागी होणार असून त्यांचेसाठी एक स्वतंत्र असे सत्र जे इंग्रजी व हिंदीमधून असणार आहे. ही एक वेगळी मेजवानी असणार आहे. या संमेलनास शुभेच्छा. तसेच या संमेलनामध्ये महाराष्ट्रातील पक्षीमित्र मोठ्या संख्येत हजेरी लावतील अशी आशा आहे. तसेच विदर्भ संमेलन चंद्रपूर येथे इकोप्रो या संस्थेच्या यजमानपदात डिसेंबर २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित होणार असून इतर विभागातील संमेलन आयोजित करण्याविषयी विभागीय समन्वयकाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत.

शहर पक्षी निवडणूक हा विषय गेल्या काही महिन्यात वेगवेगळ्या माध्यमांवर चर्चेचा मुद्दा होता. त्याचे कारण होते वर्धा येथे बहार नेचर फाउंडेशन या संस्थेने घेतलेली वर्धा शहर पक्षी निवडणूक, तसेच जळगावात एका वृत्तपत्राने घेतलेली शहर पक्षी निवडणूक. वर्धा येथे 'बहार'ने सर्व यंत्रणांना व सर्व पक्षीमित्र यांना सोबत घेऊन या निवडणुकीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पक्षी विषयक जनजागृती केली. जवळपास ५४ दिवस मतपत्रिका व ऑनलाइन पद्धतीने मतदान घेऊन ५४ हजार नागरिक व विद्यार्थी यांचे मतदान घेतले.

राज्यात यापूर्वी सावंतवाडी येथे २९ व्या पक्षीमित्र संमेलनादरम्यान २०१६ मध्ये शहर पक्षी निवडणूक घेण्यात आली होती. त्यापूर्वी मुंबई शहर व नागपूर येथे सुद्धा शहर पक्षी घोषित असून त्यामध्ये महाराष्ट्र पक्षीमित्रचा सहभाग नव्हता. आता राज्यातील अनेक ठिकाणी असा उपक्रम घेतला जाऊ शकतो व काही ठिकाणांहून महाराष्ट्र पक्षीमित्रकडे विचारणासुद्धा केल्या गेल्या आहेत. त्यामुळे शहर पक्षी निवडणूक किंवा जिल्हा पक्षी निवडणूक असे उपक्रम सर्वत्र सारख्या पद्धतीने व्हावेत, त्यामध्ये सुसूत्रता यावी यासाठी महाराष्ट्र पक्षीमित्र तर्फे एक कार्यप्रणाली ठरवून त्यानुसारच हा उपक्रम पार पाडावा असे ठरले असून, या प्रक्रियेत जिल्हा जैवविविधता समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी कार्यालय व वनविभाग, नगरपालिका किंवा महानगरपालिका अशा यंत्रणांचा समावेश असावा असे अपेक्षित आहे. ही प्रक्रिया त्या जिल्ह्यातील पक्षीविषयक कार्यरत संस्था राबवू शकते. त्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्त्वे लवकरच तयार करण्यात येत आहेत.

स्थलांतरित पक्षी आगमनाचा काळ सुरू झालेला असून राज्यातील पक्षीनिरीक्षक आळस झटकून व आपली आयुधे सुसज्ज करून तयार झाले आहेत. यादरम्यान आपापल्या भागातील पक्ष्यांवर लक्ष ठेवून, त्यांच्या नोंदी घेणे, त्यांचे छायाचित्रण इ. करतीलच. यादरम्यान आपल्या नोंदी ई-बर्ड सारख्या पोर्टलला न चुकता टाकाव्यात, काही महत्त्वाच्या नोंदी असल्यास पक्षीमित्रकडे त्याचे टिपण सुद्धा पाठवावे. तर भेटू या आगामी संमेलनात, कराड अन् चंद्रपूरला.

– डॉ. जयंत वडतकर
अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र
९८२२८७५७७३, jayantwadatkar.wecs@gmail.com

## जैवविविधता

२०१७ सालात भारतभरात २४१ अपृष्ठवंशी, २७ पृष्ठवंशीयातील २७ मासे, १८ उभयचर, १२ सरपटणारे प्राणी आणि ३०० वनस्पतींचा नव्याने शोध लागला आहे.

अशा रीतीने भारतातील प्राणीसंख्या १०११६७ इतकी झाली आहे. जागतिक प्राण्यांपैकी ६.४५% भारतात आहेत. वनस्पतींची संख्या ४९००३ वर गेली असून त्याचे प्रमाण ११.४ % आहे.

# माळढोकची गोष्ट

रात्रीच्या विमानाने मी शहरात पोहचलो. खूप वर्षांनी घरी येत होतो. आतुरता मनात दाटून आली होती. बालपणीच्या आठवणी मनात रुंजी घालत होत्या. माळावरची कुस्ती, कबड्डीचा डाव, पिळदार शिंगांच्या हरणांचा कळप. मोठी विमानासारखी सावली जमिनीवरून जाताना त्या सावलीला पकडण्यासाठी त्यामागे धावणे, ती सावली माळढोकची होती. तो पक्षी डोक्यावरून उडत जाताना पंखांचा झपझप आवाज आजही कानावर तसाच ताजा आहे. चिंचेला लटकावलेला टायरचा झोका आणि शाळेचं पटांगण मनात रोमांच आणतो. तळ्यातून मासे पकडून आणणे, वेशीवरच्या विहिरीत उड्या ठोकण्याचा रोमांच आता पुन्हा एकदा अनुभवायला मिळणार होता. सर्व स्वप्नांच्या शिदोरीची गाठ मनाशी बांधून गावाकडे निघालोय. मी अनुभवलेल्या सर्व गोष्टींचा आनंद माझ्या मुलासोबत घेण्याची संधी पुन्हा मला मिळणार होती. मध्यरात्री घरी पोहोचलो तर, वेशीबाहेर खूप अंधार होता. पण सिमेंटच्या रस्त्यावर दिवे अखंड जळत होते. पाहून दिलासा मिळाला. पूर्वी याच रस्त्याने शाळेतून घरी जाताना गणवेशाचा शुभ्र सदरा चिखलाने माखून जायचा. मी घरी येण्याच्या आतुरतेने आई-आबा आणि श्याम अजून जागेच होते. गणू मात्र झोपी गेला होता. आपल्या आई-वडिलांना, लाडक्या भाऊला खूप दिवसांनी भेटणे म्हणजे पराकोटीचा आनंदच. खूप थकल्यामुळे मी लवकरच झोपी गेलो. सर्व स्वप्ने अणि आठवणी डोळ्यांसमोर भिरभिरत होत्या.

रात्र सरली. व्हरांड्यात गाय हंबरत होती, मागच्या वस्तीत कोंबडा बांग देऊ लागला, कोसो दूर ओरडणाऱ्या मोराची मेयाउ .. मेयाउ .. माझ्या कानावर पडू लागली. मी अंथरुणातून घाई घाईत उठून खोलीबाहेर येतो तर प्रसन्न तुळशीवृंदावन, अंगणात सारवलेल्या सड्यावर सकाळच्या कोवळ्या किरणांची सोनेरी शाल पाहून भरून आलं. श्याम गोठ्यात धार काढत होता.

'काय बघतोय?' श्यामने धार काढताना मला विचारले.

'जे मी शहरातल्या इमारतीत न्हायना बघू शकत.' मी उत्तरलो.

दुधाने भरलेली तौली घेऊन माझ्या उत्तरावर हसत तो बाहेर आला.

मोठ्या बिल्डिंगमदी कोन सारवतं का? शेणाने सारवतेत का विदेशात?

त्यावर आम्ही दोघे हसलो. तो दूध कॅनमध्ये भरू लागला. मी पुन्हा विचारू लागलो.

'अरे अंगणात चिमण्या दिसत न्हाईत का? अन् आबानं लावलेलं पारिजातकाचं झाड का तोडलं?' मी जाब विचारण्याच्या स्वरात बोललो.

'मी काय तोडलं नाय ती.' श्याम उत्तरला. त्याने पुढे सांगितले-

'अन, चिमण्या? चिमण्यांचं काय धरून बसलाय? आता तर त्या मोठ्या कोंबड्या पण राहिल्या नाहीत. अन् चिमण्या कुठून दिसनार?'

गावाकडे माळढोकला मोठ्या शानदार कोंबड्या असं म्हणत असत. मी आधीच माळढोकविषयी उत्साही होतो. आणि त्याबद्दल नक्कीच विचारपूस करणार, काळवीट, धावक पक्षी पाहण्याचा हट्ट धरणार म्हणून त्याने स्वत:हून मला सांगितले. भुवया उंचावून मोठ्या डोळ्याने मी श्यामकडे पाहू लागलो. तो कॅनचं झाकण बंद करून हात धूऊ लागला.

'का रे? त्यांची संख्या कमी झाल्याचं मी वाचलंय, पण थोडे तर असतील ना टापूवरती?'

टापू ही एक अशी जागा होती जिथे माळढोक मुक्कामी असायचे. आम्ही दोघा भावंडांनी मिळून अनेकदा त्या टापूवर माळढोक पक्ष्यांना चरताना पाहिलं होतं. गवताचं रान हिरवं असताना नर गळा फुगवून शेपटी उचलून रूबाबात मिरवत असे. माद्या त्याच्या अवती-भवती फिरत असत. आमचा कबड्डी-कुस्तीचा डाव त्या टेकड्याच्या पायथ्याशी रंगायचा तर त्या पक्ष्यांचा प्रणय टापूवर चालायचा.

'आता कवातरी अमावश्याला पूर्णिमेला दिसते' असं म्हणत तो आत गेला आणि आवाज दिला.

'ये. भाकर खाऊ'

'मी आंघोळ करून जेवीन' मी उत्तरलो.

माझी जिज्ञासा आणखीनच वाढली. मी पुन्हा विचारात पडलो.

'आता बघायला गेलो तर दिसंल का रे? आपल्या गण्याला दाखवावं म्हणतोय.'

'तिकडं आता मी पण लै जात नाय, बघू दिसला का मग दाखवू.'

'थांब, तर मी पण शेताकडे येतो तुझ्याबरोबरच. गणूला पण सोबत घेऊन जाऊ.'

'हा, चल आवर मग लवकर.'

'आलोच.' म्हणत माझी ग़डबड सुरू झाली.

गणूच्या सहावीच्या पुस्तकात जेव्हा माळढोकचा उल्लेख आला तेव्हापासूनच मला या दिवसाची आतूरतेने प्रतीक्षा होती. आज नामशेष होण्याच्या स्थितीत असलेल्या माळढोक, मोजकेच काळवीट आणि अथांग पसरलेल्या माळरानाचा निसर्गानंद त्यालाही मिळवून द्यावा यासाठी माझी धडपड चालली होती. मी, श्याम आणि गणू स्कूटरवरून शेताकडे निघालो. गावच्या अरुंद वाटांवर आम्ही निघालो तसतशी मला प्रत्येक गोष्ट आठवू लागली. शाळेच्या मैदानाला कंपाउंडने घेरले होते. इमारत नवीन झाली होती. काळ्या मातीच्या मैदानाचे चित्रच बदलले होते. कौलारूच्या वळचणीत घरटं करणाऱ्या चिमण्यांची जागा पक्क्या विटांच्या बांधकामाने घेतली होती. पाऱ्यावरचे चिंचेचं भलं मोठं झाड आज तिथे नव्हतंच. मी आश्चर्याने विचारलं,

'अरे झोपाळ्याचं झाड कुठं गेलं?'

'मागच्या उन्हाळ्यातील अवकाळी पावसात झाडावर वीज पडली आणि पूर्ण झाड कोसळलंय. त्यात गवळ्याची एक म्हैस अन् एक वासरू मेलं.'

खूप वाईट वाटले. या वादळाबाबत श्यामने मला पूर्वीच कळवले

(पृ.५ वर...)

(पृ.४ वरून...)

होते, पण ते फक्त पिकाच्या नुकसानीबाबत. गावाचं खूप नुकसान झाल्याचं सर्व विवरण त्याने मला सांगितलं. वेशीच्या बाहेर पडताच माझं लक्ष उंच उंच धुराडीने खेचून घेतलं.

'हे काय, नवीन चिमणी कशाची? कापड गिरणी परत चालू झाली काय?' मी विचारले.

'कुठलं रे दादा! इथे नवीन इंडस्ट्री आल्यात का?'

मी आता पूर्णपणे बुचकळ्यात पडलो होतो.

'नवीन कारखाने पन सुरू झालेत. लै पोरं कामाला तीत चाललेत. शेतात गडीबी मिळंना आता.'

मी पाहत होतो, दूरदूरपर्यंत कुठेच गवती माळरान नजरेत पडत नव्हता. तळ्याच्या पलीकडे आमचं शेत होतं. तलावाच्या सभोवताली नवीन घरं आणि इमारतीची रांग लागली होती. कारखान्यांच्या सांडपाण्यामुळे कोळ्यांची मासेमारी कायमची थांबली होती.

'आता कुणी पवायला इथं येत नाय.' श्यामने तलावाकडे हातवारे करत खुणावून सांगितले.

आम्ही या तळ्यात पोहण्याच्या शर्यती लावायचो. मासे पकडायचो. बदकांचे आणि बगळ्यांचे थवे पहायचो. पण आज तेथे हत्तीगवत आणि जलपर्णींचे पूर्ण आच्छादन होते. गणू तर हे सर्व काही नव्याने पाहात होता. आम्हा दोघांच्या तणावपूर्ण संभाषणात त्याचा प्रश्नार्थक चेहरा मला असमाधानकारक बनवत होता.

आम्ही शेतावर पोहचलो. ज्वारीचं ताटं पाहून मनात नवतरंग निर्माण झाले. ते पहात गणूने मला विचारलं, 'पापा, हे काय आहे?'

'अरे हेच तर आपलं अन्न आहे. आपण जी भाकरी खातो ती याच तर ज्वारीची आहे.'

'हे कसं काय आलं जमिनीवर?' गणूने विचारलं.

मी आणि श्याम हसू लागलो.

गणूला घेत श्याम उत्तरला, 'आहो लाडके पुतणे, हे तुमच्या आजोबानं अन् काकानं पेरलं, पानी दिलं, मग कुठं हे इतकं उगवलंय.'

'चल टापूकडं एक चक्कर मारू.' मी म्हणालो.

शेतातून निघून तळ्याच्या किनाऱ्यावरून आम्ही पुढे निघालो. वाटेच्या कडेला वनविभागाचा फलक गणूच्या नजरेत पडला आणि त्याने विचारले, 'काका, माझ्या पुस्तकातलं हरणाचं चित्र इथे लावले आहे; ते इथं राहतात का?'

'आधी लय होते इथं. आता त्यांना राहायला जागाच राहिली नाय ना.., खायला गवत नाय, मग कुठे राहणार ते, कसं जगणार? आता लैच कमी झालेत.' श्याम उत्तरला.

बराच वेळ झाला आम्ही पायपीट करत फिरू लागलो. वाटेत थोडीफार झाडी आणि पक्षी दिसले, पण आम्ही ज्याच्या शोधात होतो ते मात्र कुठेच दिसत नव्हते. फिरून आम्ही अभयारण्याच्या मचानामध्ये आलो. विचार केला इथे तरी काही पक्षी-प्राणी दिसतील. चार फर्लांग लांबीवर अभयारण्याचे फाटक पाहू शकत होतो इतकंच. त्याचा विस्तार सध्या संरक्षित राहिला होता. मी आणि श्यामने पाहिलेल्या वन्यजीवांची माहिती आणि अनुभव गणूला सांगत होतो. मचानाच्या भिंतीवरची वन्यजीवांची चित्रे पाहून गणू म्हणाला, 'मी सहलीला गेलो होतो तेव्हा सगळे प्राणी हत्ती, वाघ, कोल्हा पाहिले. पिंजऱ्यात खूप प्राणी होते. पण त्यात काळवीट आणि माळढोक नव्हते. हे चित्रातले प्राणी इथे दिसतील ना आता? मला बघायचे आहेत.'

मी खिन्न झालो. माझ्याकडे उत्तर नव्हते. श्यामलासुद्धा माझ्या भावना समजत होत्या. त्याने कडवट हृदयाने गणूच्या प्रश्नाचे उत्तर दिले. 'अरे! प्राणी संग्रहालयात त्यांची काळजी घेत असतेत तिथले लोकं. हिथं त्यांनाच सगळं करावं लागतं.'

'म्हणजे?' गणूने प्रश्नार्थक विचारले.

काय उत्तर द्यावे मला कळेनासे झाले. कारण पर्यावरणाची झालेली नासधूस, औद्योगीकरणाचा हस्तक्षेप, आकसलेले संरक्षित वन, सर्व पाणथळ ठिकाणे नष्ट झाले होते. अशा प्रदूषित ठिकाणी कोणते निसर्ग कसे अबाधित राहू शकेल? या विचारांनी मला पूर्ण घेरले होते. मी जो निसर्ग पाहिला होता, ज्या अप्रतिम सौंदर्याचा आस्वाद घेतला होता ते मी माझ्या मुलाला मिळवून देऊ शकलो नाही. तेवढ्यातच आबा हातात पिशवी घेऊन तेथे आले.

धोतर सावरत ते उत्तरले, 'याला निसर्ग म्हणतात पोरा! जेव्हा तुझा बाप तुझ्या एवढा होता त्या काळी रंगवलेली चित्रं त्यांना बघूनच या भिंतीवर काढलीत.' आबांनी पिशवीतून माझी जुनी चित्रकलेची आडवी वही काढली. त्यातली पानं उघडून दाखवत ते म्हणाले, 'हे बघ तुझ्या बापाने काढलेलं चित्र.'

पेन्सिल आणि खडूने रंगवलेली प्राणी पक्ष्यांची चित्रे, जी मी माझ्या विद्यार्थी दशेत काढलेली, आबा गणूला दाखवू लागले. गणू देखील ती नरम पडलेली कागदं उत्सुकतेने न्याहळू लागला. तो खुश झाला.

'पपा, ही सर्व चित्रं तुम्ही काढलीत?' गणूने विलक्षण स्वरात विचारले.

'होय.' मी उत्तरलो.

मी मनातून पूर्णपणे हळहळलो. वृत्तपत्रांची काही कात्रणे हळूच माझ्याकडे सरकवत आबा म्हणाले, 'असं सगळं घडल्यानंतर ही जनावरं कशी दिसतील या आजकालच्या पोरांना!'

'माळढोक हटवा ! शेतकरी वाचवा!'

'प्रगणेत फक्त तीनच माळढोक'

'शेवटच्या प्रजननाची नोंद सात वर्षांपूर्वी'

'अख्या राज्यात फक्त तीनच ठिकाणी आढळले माळढोक'

अंगावर शहारे आणणाऱ्या मथळ्यांच्या बातम्यांची कात्रणे पाहून मी थक्क झालो!

'सरकारनं नीट त्यांचा पन इचार केला नाय. अन आमचा पन नाय.' श्याम उद्‌गारला.

आबा पुढे म्हणाले, 'यात त्या मुक्या जनावरांचा काय दोष? आता

(पृ.६ वर...)

**पुस्तक परिचय -**

# माळढोक : द ग्रेट इंडियन बस्टर्ड - कोरिओटीस निग्रीसेप

**लेखकः बी. एस. कुलकर्णी**

**प्रकाशकः अनुबंध प्रकाशन, सोलापूर, पृष्ठेः १०४ मूल्यः ₹ १२५/-**

बी. एस. कुलकर्णींना माळढोकच्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करताना माळढोकच्या निवासाचा प्रदेश अनुभवता आला. तसेच सातत्याने माळढोक या पक्ष्यांचा अभ्यास करीत राहिल्याने त्यांना अगदी आंतरराष्ट्रीय संमेलनातही सहभागी होता आले. या सर्व अनुभवांचे प्रतिबिंब या पुस्तकात उमटलेले दिसते. काही दुर्मीळ अनुभव कथानकांमध्ये माळढोकचे प्रणयाराधन, माळढोक नर व मादीचे वर्णन, त्यांचे खाद्य तसेच अगदी राजस्थानपर्यंत शिकारी लोक माळढोक मारण्यासाठी उंटाचा वापर करीत याचाही उल्लेख आहे. माळढोकचे शत्रू म्हणजे भटकी कुत्री, कोल्हे, लांडगे आणि मानव.

ऐतिहासिक नोंदी देताना दोन-तीन दशकांपूर्वी अहमदनगर, नाशिक, सोलापूर या परिसरात मोठ्या संख्येने माळढोक असल्याच्या नोंदी दिलेल्या आहेत; तसेच त्या काळात मोठ्या संख्येने शिकार झाल्याच्याही नोंदी तिथे दिलेल्या आहेत. त्या कालावधीत सोलापूरजवळील नान्नज हे माळढोक पर्यटन केंद्राचा विकास होणे गरजेचे होते असे लेखक नमूद करतात.

माळढोकची शरीरचना, माळढोकचा रुबाब, माळढोकचा 'मार्शल वॉक', माळढोकचे दर्शन, माळढोकची छायाचित्रे याबद्दल सुरेख नोंदी यात दिलेल्या आहेत. माळढोक वाचविण्यासाठी काय उपाययोजना अपेक्षित आहेत? त्याची शास्त्रीय माहिती पुस्तकात देण्यात आली आहे.

एकूणच सोलापूरच्या पर्यावरणावर असलेला माळढोकचा प्रभाव इथे दिसून येतो व माळढोकचा प्रदेश कमी झाल्याने होणारे परिणामही लेखकांनी इथे अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले आहेत. १०४ पृष्ठसंख्या असलेल्या या पुस्तकाचे मुखपृष्ठ ऐतिहासिक ठेवा असल्याप्रमाणे




माळढोकच्या छायाचित्राला परिणाम देण्यात आला आहे, तर मलपृष्ठावर माळढोकच्या पिसांची छायाचित्रे आहेत. शेवटच्या ३ ते ४ पृष्ठांवर नकाशे आकडेवारीसह बी. एस. कुलकर्णी या माळढोकप्रेमी लेखकाचे श्री. राजेंद्रसिंहजी, डॉ. सालिम अली यांचेबरोबरचे छायाचित्र, तसेच माळढोकांची दुर्मीळ अशी कृष्णधवल छायाचित्रे छापण्यात आली आहेत.

एकूणच नामशेषाच्या मार्गावर असलेल्या 'माळढोक'चा म्हणजेच 'वन्यजीव संपदेचा' हा ऐतिहासिक ठेवा वाचकांना निश्चितच वेगळा अनुभव देईल. अनुबंध प्रकाशनचेही विशेष कौतुक!

– अनिल रतिलाल माळी

*मोबा. ९८५०८१८६४४, इ-मेल :* anilrmali@yahoo.co.in

# माळढोकची गोष्ट

(पृ.५ वरून...)

कोण मोठं शास्त्रज्ञ आली काय आणि कुनाचं सरकार आलं काय परत जी जनावरं आनू शकतील का?'

असंतोषाची परिसीमा तेव्हा गाठली जेव्हा मी पुढील वृत्तांत वाचले - 'निसर्गप्रेमी निघाले वन्यजीवन निरीक्षणाच्या मोहिमेवर.'

त्यात असे नमूद केले होते की, माझ्या गावची निसर्गप्रेमी मंडळी वन्यजीवन पहायला दुसऱ्या राज्यात जात होते. एका बाजूने सौख्य वाटत होते की इथल्या नागरिकांमध्ये निसर्गाविषयी आसक्ती होती. पण दुसऱ्या बाजूला शरमही वाटत होती. दुर्मीळ पक्ष्यांचे आढळ असणारे माझे गाव जगजाहीर आहे. आता मात्र याचा एक संदर्भच उरला आहे.

'सरकार आता या जागेला निरुपयोगी म्हणून जाहीर करणार आहे असं म्हणत होते. अभयारण्याची मान्यता काढून टाकतील का काय माहीत.' श्याम म्हणाला.

काही क्षणांच्या शांततेनंतर गणू म्हणाला, 'आबा, मग आपण पण जायचं का आफ्रिकेला. खूप प्राणी आहेत म्हणे तिथे. इथं तर आता फक्त पपांनी काढलेली माळढोकची चित्रंच राहिली आहेत.'

मी आणि श्याम पूर्णपणे शांतच झालो. गणू केवळ दोनच वाक्यात गूढ अर्थाने खूप काही बोलून गेला. आबांनी हसून उत्तर दिले,

'जाऊ की...'

– राघवेंद्र वंजारी आणि राहुल वंजारी

# गिधाडांच्या आठवणी

**व्हल्चर्स ऑफ पन्ना**

दि नेचर व्हालेंटीअर्स, इंदूर या संस्थेने प्रसिद्ध केलेले 'व्हल्चर्स ऑफ पन्ना' हे कॉफीटेबल बुक वाचनात आले. पन्ना टायगर रिझर्वमधील गिधाडे असा विषय या पुस्तिकेचा आहे. भारतीय उपखंडात गिधाडे नामशेष होत असताना पन्ना मध्ये गिधाडांची संख्या मात्र स्थिर होती, असे लेखकाचे म्हणणे होते आणि त्याला तर्कसंगत पुरावेही दिलेले आहेत. पाळीव जनावरांना दिले जाणारे डायक्लोफिनॅक औषध पन्ना परिसरातील शेतकऱ्यांना माहीतही नव्हते. मुळात पाळीव जनावरांना औषधपाणी करण्याची आर्थिक आणि मानसिक शक्ती परिसरातील लोकांना नव्हती. हे वाचताना माझ्या मनात सांगली परिसरातील गिधाडांच्या आठवणी चाळवल्या.

मी पक्षी निरीक्षण १९९० साली सुरू केले आणि त्याच वर्षी मी सांगली परिसरात गिधाड पाहिल्याचे स्मरते. आणि त्याचा एकमेव फोटोसुद्धा माझ्याकडे आहे. त्यानंतर आजपर्यंत मी सांगली परिसरात कोणत्याच जातीचे गिधाड पाहिलेले नाही.

**किशोर वयातील उनाडक्या**

माझ्या गिधाडाच्या आठवणी या १९६५ ते १९७५ या काळातल्या आहेत. माझे वडिलार्जित घर सांगलीतील गावभाग परिसरात होते. माझ्या घरापासून साधारण दोनशे मीटर (हवाई अंतर) पश्चिमेस कृष्णा नदी आणि हिंदू स्मशान भूमी, दक्षिणेस ढोर वस्ती, लिंगायत स्मशान भूमी आणि एक छोटा कातडे कमाविण्याचा कारखाना. आम्ही मुले नेहमीच या परिसरात गळ्यात लगोऱ्या अडकवून पाखरे मारत फिरत असू. आमच्या घरात बंदूका होत्या. आमचे थोरले भाऊ खांद्याला बंदूका अडकवून नदीकाठी फिरत असत आणि त्यांच्या मागे आम्हीही फिरत असू.

सांगली जरी नगरपरिषद असलेले गाव असले तरी ते अगदीच लहान होते. गावाचा मुख्य व्यवसाय शेती होता. शेती बहुतांश कोरडवाहू होती. त्यामुळे एकदा सुगी संपली की राने रिकामीच असत. गावभागात घरटी एक गोठा आणि तीनचार जनावरे असत. दुपारच्या वेळी जनावरांचे खांडवे पाण्यावर घेऊन येणारे गुराखी हे नित्याचे दृश्य होते. त्यामागून शेण गोळा करणाऱ्या काही स्त्रिया असत. हेच शेण त्या 'बामण' गल्लीत सारवण्यासाठी विकत असत.

एखादे जनावर दगावले तर ते लिंगायत स्मशानभूमीच्या मोकळ्या मळीत टाकले जाई किंवा नदीकाठी टाकले जाई. ढोर ताबडतोब त्याचे कातडे काढून घेत असे आणि बाकी कलेवर कावळे, कुत्री आणि गिधाडांच्या स्वाधीन केले जाई. शेकडोंच्या संख्येने गिधाडे त्यावर उतरत. अशा वेळी त्यांचेच राज्य तिथे चाले. कुत्र्यांनासुद्धा जवळपास येऊ देत नसत. सकाळी टाकलेले कलेवर संध्याकाळपर्यंत त्याचा सांगाडा राही. पुढील चार दिवसात तोही चकचकीत हाडांचा ढीग उरे. कोणीतरी ती हाडे उचलून नेत आणि तिथे जळलेले गवत उरे. कुजण्याच्या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या उष्णतेने तेथील गवत जळत असावे.

**गिधाडांचे विश्रांतिस्थान आणि त्यांची वागणूक**

हरिजन वस्तीच्या पश्चिमेला नदी तटावर दोन भली मोठी चिंचेची झाडे होती. त्यावर त्या गिधाडांची वस्ती असे. गिधाडे मेलेल्या जनावरावर कशी येतात, ते कोठून खायला सुरुवात करतात, नंतर कशी उडतात, हे लहानपणी पाहिलेले आठवते. कर कर असा आवाज करीत ही गिधाडे मृत जनावराच्या आसपास उतरत. त्याआधी जवळच्या एखाद्या झाडावर ती थांबत. ढोरांनी कातडे काढले असेल तर ते सरळ मास खायला सुरू करत. तसे नसेल तर जनावराच्या गुदद्वारात मान आतपर्यंत घुसवून आतड्याचा भाग ओढून काढून ते प्रथम खायला सुरुवात करत. जसजशी त्यांची संख्या वाढत जाई तसतसे ते मृत जनावर पूर्ण झाकले जाई आणि पुढे त्याचे कोण आणि कसे कातडे फाडे ते न कळे.

आम्ही मुले लगोरीने त्यांना दगडे मारत असू, पण त्यांच्यावर काहीही परिणाम होत नसे. मग आम्ही मोठे दगड अगर विटा फेकत असू. ते दगडविटा त्यांच्या अंगावरून उशी खाऊन बाजूला पडत असत.

एकदा असेच एक मेलेले गाढव नदीच्या वाळवंटात पडले होते. बघता बघता शे दोनशे गिधाडे जमा झाली. त्यावेळी त्यांची जात वगैरे कळत नव्हते. मात्र ती 'White-rumped Vulture' पांढऱ्या पुठ्ठ्याची गिधाडे असावीत असे वाटते. काही वेळ ती नुसतीच घुटमळत होती. मग त्यातले एक पुढे आले आणि त्यांनी गाढवाच्या गुदद्वारात डोके, नंतर पूर्ण मान आत खुपसून आतडी खेचून बाहेर काढली. पहता पाहता सर्व कळप त्यावर तुटून पडला. आम्हाला त्यावेळी असे सांगितले जाई, गिधाड शिकार करतात, त्यांची शिकार करण्याची पद्धत म्हणजे 'एखादे जनावर हेरायचे, सर्वांनी मिळून त्याला पंज्यात पकडायचे आणि उंच आकाशात घेऊन जायचे', आणि तेथून सोडून द्यायचे. असे मेलेले जनावर मग ते खातात. (हे खरे नाही – संपादक)

गिधाडांचे खाणे पाहताना आम्ही त्यांच्या खूप जवळ जात असू. माझा एक भाऊ होता तो आमच्यापेक्षा मोठा. तो नेहमी सांगे आपण एका गटात राहायचे, एकटे दुकटे नाही; म्हणजे त्यांना उचलता येणार नाही. एकदा एका गिधाडाच्या अंगावर त्याने एक वीट मारली, ती वीट त्याच्या पाठीवर बरोबर दोन पंखांच्या मधील खोलगट भागात जाऊन बसली. ती वीट तशीच अंगावर घेऊन ते गिधाड बराच वेळ मेलेले गाढव खाण्यात मग्न होते.

पोट भरले की त्यांना हालचाल करणे खूप जड जात असे. त्यांचे पोट जवळ जवळ जमिनीला टेकले असे वाटे. अशा वेळी त्यांचे उडणे पाहण्यासारखे असे. ती चलत चालत लांब जात आणि मग धावायला सुरुवात करत. धावता धावता पंख पसरून विमानासारखे उड्डाण करत,

(पृ.८ वर...)

(पृ.७ वरून...)

चक्राकार उडत उंच आकाशात जात. याच तऱ्हेने शे दीडशे गिधाडे उडताना पाहताना भान हरपून जात असे आणि तितकीच भीती मनात असे.

**गिधाडांचे नष्ट होणे आणि भटक्या कुत्र्यांचा उपद्रव**

गिधाडे संपली तशी हे काम भटकी कुत्री करू लागली. या अन्नावर पोसलेल्या भटक्या कुत्र्यांची संख्या गावोगावी वाढली आहे. गिधाड ५० कि. मी. परिसरात अन्न शोधू शकते. तसे कुत्र्याचे होत नाही. त्यामुळे असे अन्न त्यांना मिळाले नाही तर ती शेळ्या, रेडकू, वासरे इतकेच काय पण लहान मुले, म्हाताऱ्या माणसांच्यावर हल्ले करताना पहायला मिळत आहे. भटक्या कुत्र्यांनी असे हल्ले केल्याच्या बातम्या गेल्या वीस वर्षांत वरचेवर वाचायला मिळतात. त्यात पाळीव प्राणी, लहान मुले, महिला आणि वृद्ध यांचा समावेश असतो. पक्षी निरीक्षण करताना एकटाच असतो आणि अशा १५-२० कुत्र्यांचा कळप हमखास दिसतो. मनात हल्ला केलाच तर आपण काय करायचे याची जुळवाजुळव होऊ लागते. आपणच प्रथम आक्रमक भूमिका घेणे उपयुक्त ठरते, म्हणजे हातात दगड घेणे, एखादी काठी किंवा तशीच वस्तू हातात घेणे हे खूप फायद्याचे ठरते. भटकी कुत्री नेहमी एकट्या व्यक्तीवरच हल्ला करतात असे दिसून येत आहे.

**पांढरे गिधाड**

मागे मी कातडे कमविण्याच्या उद्योगाचा उल्लेख केला आहे. ढोर कातडे सोलून ते पायावर अगर फळीवर पसरवून लांब पात्याच्या सुरीने त्याच्या आतील बाजूला चिकटलेली चरबी तासून काढीत. नंतर त्या कातड्यांच्या खोळी शिवत आणि त्यात औषधी पाणी भरून टांगून ठेवत. ठराविक दिवसांनी ते कातडे काढून बाभळीच्या सालीवर वाळत ठेवत. मग त्याचे लिलाव होत. हा परिसर दुर्गंधी, माशा यांनी सदैव भरलेला असे. तरी आम्ही मुले नाक-तोंड दाबत, ओकारी मागे ढकलत हे सर्व पहात असू,

काढलेली चरबी एके ठिकाणी साठवली जात असे. या ढिगापाशी मोठे पांढऱ्या रंगाचे पक्षी दिसत. त्यांना आम्ही 'पांढरी गिधाडे' म्हणत असू. ते पक्षी म्हणजे Egyptian Vulture होती. ही गिधाडे हिवाळ्यात दिसत असत असे आठवते.

पुढे कत्तलखाने निघाले आणि इथला उद्योग हलला. आज तेथे अपार्टमेंट उभी आहेत आणि शेकडो लोक रहात आहेत. कोणाला हे सांगितले तर पटणारही नाही.

असाच एक उद्योग मी पक्षी निरीक्षण करताना पाहिला. सांगलीजवळील मिरज परिसरात एक मोठा कत्तलखाना आहे. तिथे पक्षी निरीक्षणास मी नेहमी जात असे. जनावराच्या प्रत्येक अवयवाचा आता व्यापारी उपयोग आहे. त्यामुळे त्याचा केससुद्धा बाहेर पडत नाहीत. एक माणूस मला तिथे भेटत असे. तो जनावराची आतडी गोळा करून ती आतून धुऊन काढीत असे. मग आतड्याच्या एका तोंडाला गाठ मारून ते बंद करायचे आणि दुसऱ्या बाजूने तोंडाने हवा भरून ते आतडे फुगा फुगविल्यासारखे फुगवायचे. असा फुगा वाळण्यासाठी टांगायचा. असे शेकडो फुगे तिथे वाळत घातलेले पहायला मिळत असत. तोंडाने हवा फुंकून फुंकून त्या माणसाचे गाल आणि डोळे बाहेर आलेले होते. ही आतडी व्यापारी विकत नेत असत. मी त्याला सहज विचारले, याचे काय करतात? त्याचे उत्तर 'फोटोची फिल्म'. मला हे पटले नाही.

**व्हल्चर रेस्टॉरंट**

गिधाडांची संख्या स्थिरावताना दिसत आहे. तसेच व्हल्चर रेस्टॉरंट जागोजागी चालू झाली आहेत. याबाबत एक सुचवावेसे वाटते, एकाच जागी नेहमी मेलेले जनावर न टाकता त्याच परिसरातील ५० कि. मी. च्या परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी टाकावीत. तसेच त्यात अनियमितता असावी, म्हणजे एकाच ठिकाणी सतत होणारी घाण टळेल आणि गिधाडांना अन्न शोधायची सवय राहील.

आपण निसर्गचक्रात आधी ढवळाढवळ करतो आणि नंतर उत्तरे शोधत राहतो. अर्थात असे होत राहणार. कारण दुधाचा महापूर योजना आणणाऱ्यांना त्याचा परिणाम गिधाडांच्यावर होईल असा विचार येणे केवळ अशक्य.

– शरद आपटे, सांगली.

## नाचण पक्ष्याने पळवले शिकारी पक्ष्यांना

७ जुलै २०१३ ची सकाळ. आणंद जवळच्या चिकोद्रा खेड्यात आम्ही पोचलो तेव्हा ओरिएंटल हनी बजर्डची जोडी हवेत घिरट्या घालत होती. जरा वेळाने त्यातील एक पक्षी कडू निंबाच्या झाडावर विसावला. थोड्या वेळाने नाचण पक्ष्याने बजर्डच्या मानेवर, पाठीवर चोचीचा मारा करायला सुरुवात केली. बजर्डने काही वेळ लक्ष दिले नाही. पण जेव्हा हल्ल्याची तीव्रता वाढली तेव्हा त्याने पलायन केलं. लगोलग नाचणने त्याचा पाठलाग सुरू केला. बजर्ड दूरवर एका खांबावर स्थिरावला. तिथे नाचणचा हल्ला चालूच राहिला. त्याने पंख फडफडवत नाचणला हाकलण्याचा प्रयत्न केला. पण नाचणचा हल्ला चालूच राहिल्यावर त्याने उडून जाणे पसंत केले. काही वेळ नाचण त्याचा पाठलाग करत होता.

असाच प्रकार १२ एप्रिल १४ रोजी जंबूघोडा अभयारण्यात पाहता आला. इथे नाचणच्या जोडीने एका गरुडावर हल्ला केला होता.

सालिम अलींच्या निरीक्षणानुसार नाचणच्या विणीचा हंगाम फेब्रुवारी ते ऑगस्ट दरम्यान असतो. या काळात नाचण आक्रमक असतो. त्यांच्या घरट्यांच्या आसपास येणारे कावळे, मांजर यांच्यावर धावून जातात. त्यातलाच हा प्रकार असावा.

– सोहम ब्रह्मभट्ट् आणि इतर

(Flamingo वरून साभार)

# सारंगागार

विदर्भाची शैक्षणिक, सांस्कृतिक पंढरी म्हणून अमरावती हे शहर ओळखलं जातं. अलीकडे या शहरात बऱ्यापैकी रस्ते आणि पुलांच्या विकास कामाला गती आली आहे. मात्र माणसांनी गजबजलेल्या या शहरात पोपटांचं पण एक छोटंसं गाव आहे. हे गाव जमिनीवर नसून ते आहे पिंपळाच्या एका मोठ्या महावृक्षावर. होय, हे खरं आहे. एक झाड म्हणजे पक्ष्यांचं गावच ना! कारण त्या झाडावर राहतात असंख्य पोपट. गेल्या कित्येक वर्षांपासून अनेक ऋतुचक्रांतून त्यांचंही जीवनचक्र सुरू आहे.

पोपटांचं हे अनोखं गाव आहे चक्क पोलीस स्टेशनच्या सुरक्षित आवारात. अनेक विकासकामांमुळे रस्त्यांच्या आजुबाजूच्या कित्येक झाडांची कत्तल होते, पण हे पाखरांचं गाव अमरावती राजापेठ पोलीस स्टेशनच्या परिसरात गेल्या साठ-सत्तर वर्षांपासून सुरक्षित आहे. या परिसरात पिंपळ, कडुनिंबाची चार-पाच मोठी झाडं आहेत. या झाडांवर हे पोपट राहतात. हे केवळ एक पिम्पळाचं झाड नसून ते आहे हजारो पोपटांचं एक गाव!

एक दिवस भल्या पहाटे मी या परिसरात गेलो. नुकत्याच संपलेल्या शिशिरामुळे बोडक्या झालेल्या झाडांवर वसंत ऋतूची हिरवी कोवळी छाया पसरली होती. येथील हे झाड हळूवारपणे ह्जारो पोपटांच्या कलकलाटानं जागं होऊ लागलं होतं. येणाऱ्या जाणाऱ्या कित्येक नागरिकांचं लक्ष वेधून घेत होतं. पहाटे अन्नाच्या शोधात निघण्याची झाडांवरील पोपटांची लगबग सुरू होती. काही पोपट आपापले पंख साफ करत होते. काही एकमेकांना आवाज देऊन जागं करीत होते, तर काही पोपट एकमेकांच्या झाडांवर जाऊन निघण्याच्या सूचना देत होते; आणि मग काही क्षणातच हजारो पोपट आपापले पंख फडफडवून, आवाज देत थवेच्या थवे दिगंतरातून दूर गावी अन्नाच्या शोधात निघून गेले. यावेळी एखादं वादळ उठावं तसं हे दृश्य होतं. या विलोभनीय दृश्यानं मी आचंबित झालो होतो. पूर्व दिशा उजळायच्या आतच पोपटांचं गाव अबोल होऊन गेलं होतं. महत्त्वाचं म्हणजे, पोपटांच्या या गावातील झाडांवर केवळ पोपटच राहतात, तेही हजारोंच्या संख्येत. यांनाच रावे असेही म्हणतात.

त्यानंतर परत मी सांजवेळी तेथे पोहोचलो. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास हळूहळू पोपटांचा एक एक थवा झाडावर परतण्यास सुरुवात झाली होती. फांदीफांदीवर, पानापानांत जागा शोधण्याची लगबगही सुरू झाली होती. पोपटांचा आवाजही वाढू लागला होता. थव्यामागून थवा असे हजारो पोपटांचे थवे झाडांवर जागा शोधू लागले होते. आता तर परिसरात केवळ आणि केवळ पोपटांचाच आवाज येत होता. एवढा की बाजूच्या रस्त्यावरील वाहनांच्या वर्दळीचा आवाजसुद्धा झाकोळून गेला होता. दिवसभर शांत असलेली झाडं पानापानांतून पोपटांची भाषा बोलू लागले होते.

बोडकी झाडं पोपटांच्या उपस्थितीमुळे लदबदल्यासारखी दिसत होती. झाड पानापानांतून पोपटांची भाषा बोलू लागलं होतं. रात्रभर हे पोपट निवाऱ्यासाठी येथेच असतात. अशा झाडांना मारुती चितमपल्ली यांनी 'सारंगागार' किंवा 'पक्ष्यांचा रातनिवारा' असं म्हटलं आहे. रात्र संपून जाते आणि पूर्वेचं तांबडं फुटता फुटता या गावाल परत पोपटांचा कंठ फुटतो. माझ्या मते, त्यांच्या आवाजातून जणू काही हे केवळ आमचंच गाव आहे, असं सांगायचं असावं.

येथील सर्वांत मोठा पिंपळाचा वृक्ष शंभरी पार केलेला असावा. तर दुसरे पिंपळाचे झाडही शतकाकडे झुकलं असावं. गेल्या कित्येक वर्षांपासून आतापर्यंत या झाडावर पोपटांच्या कित्येक पिढ्या विसावल्या असाव्यात. उत्पत्ती, विनाश आणि विनाशातून परत उत्पत्ती निसर्गाचं हे चक्र सुरूच राहणार आहे. सोबतच हा वृक्ष वारसा वृक्ष म्हणून जतन होणे गरजेचे वाटते. पर्यावरण तज्ज्ञांतर्फे त्या दृष्टीने या परिसराचा आणि झाडांचा विशेष अभ्यास होणे आवश्यक आहे.

जीवन-मरणाच्या या चक्रात जोपर्यंत पोपटांचं हे इवलंसं गाव सुरक्षित आहे तोपर्यंत ते गजबजलेलंच राहणार आहे. नागरिकांचं रक्षण करणाऱ्या पोलिसांप्रमाणे अमरावतीकर नागरिकही पोपटांच्या या सारंगाराचं रक्षण करतील, अशी अपेक्षा करू या; आणि निसर्ग संतुलनात महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या पोपट नावाच्या या निसर्गाच्या एका इवल्याशा घटकाला सलाम करू या!

– प्र. सु. हिरुरकर
ranbhul@gmail.com
*(लोकसत्तावरून साभार)*

## टिटवीने केले छपरावर घरटे

टिटवी सामान्यत: माळावर उथळ घरटे करते. जामनगरमधील माझ्या घराजवळच्या एका बंद घराच्या छपरावर १५ मार्च १८ रोजी एका टिटवीने (Vanellus indicus) घरटे केलेले माझ्या पाहण्यात आले. १० आणि ११ एप्रिलला तिथे तीन पिले जन्माला आली. आश्चर्याची बाब म्हणजे ११ एप्रिलला टिटवी नर-मादी आपल्या पिलांना ढोसून खाली उडी घेण्यास प्रवृत्त करीत होते. पिले केवळ एक दिवसाची होती. त्या सर्व पिलांनी जवळजवळ अकरा फूट उंचीच्या छपरावरून उडी मारली. त्यांना कोणतीही इजा झाली नव्हती. ती पिले काही दिवस परिसरात चरताना दिसत होती.

– जतीन ध्रुवे (Flamingo वरून साभार)

# नाच रे मयुरा

एक दिवस कुणातरी पेशंटनं माझ्यासमोर दोन अंडी ठेवली. त्याला जंगलात ही अंडी सापडली होती. कोंबडीच्या अंड्यापेक्षा आकारानं मोठ्ठी आणि रंगानं वेगळीच दिसणाऱ्या अंड्यांपैकी एक अंडे मी उचलून पाहिलं. आकाराच्या मानानं जरा हलकंच वाटलं मला ते. माझी खात्री होती की जुमडे दादांनी किंवा बाबांनी त्याला माझ्याकडे पाठवलं असावं. मी ती दोन अंडी घेऊन बाबांकडे गेलो. त्यावेळी बाजूच्या मधूभाईजींच्या खोलीजवळ हॉलमध्ये दोन कोंबड्या त्यांची अंडी उबवतच होत्या. दोघींची अंडी वेगवेगळ्या दोन टोपल्यात घालून शिंकाळ्यासारखी त्या खुंटीला लटकावून ठेवली होती. बहुधा सिंधूमावशीचं ते काम असावं. मांजरीपासून सुरक्षित राखण्यासाठी ही युक्ती केली गेली असावी आणि हे त्या कोंबड्यांनीही मान्य केलं होतं. बाहेर चरून आल्या की ह्या कोंबड्या टेबलावर उडी मारून मग उडून टोपलीवर जाऊन बसत असत. जंगलात सापडलेली मोराची अंडी कोंबडीकडून उबवून घेता येतात हे मला माहीत होतं. मग त्या दोघीतील वयानं पोक्त वाटणारी कोंबडी बाहेर गेलीय आणि जवळपास नाही अशी संधी साधून मी ती दोन अंडी तिच्या अंड्यात ठेवून दिली. ही अंड्यांची वाढलेली संख्या त्यांच्या लक्षात आली नसावी, पण अंड्यांचं वेगळेपण तिच्या लक्षात आल्यावाचून राहिलं नसावं असं वाटतं. पण तिनं ते काम स्वीकारलं. असं म्हणतात की, कोकीळा जेव्हा कावळीच्या अंड्यांमध्ये आपलं अंडं ठेवते, तेव्हा ती कावळीचं एक अंडं घरट्याबाहेर ढकलून देण्याची हुशारी दाखवते. मी तशी काही हुशारी दाखवली नव्हती, पण त्यामुळे काही बिघडलं नाही.

कालांतरानं अंडी उबवली गेली. इतर पिलांच्या तुलनेत आकारानं मोठी असलेली, आणि झपाट्यानं आकार बदलणारी दोन मोराची पिलं कोंबडीच्या इतर पिलांसोबत खाताना दिसू लागली. तशी ती पिल्लं कोंबडीच्या पिलांसोबतच वाढत होती. कोंबडीच्या पिलांसोबतच खातपीत होती. पण चरताना जरा दूरच राह्यची. कोंबडीनं पायानं उकिरडा उकरून पिलांना बोलावलं तरी ही पिलं जरा बाजूलाच राह्यची. तीनचार दिवसांनीच त्यातील एक मोराचं पिल्लू कोल्ह्यानं किंवा कुत्र्यानं उडवलं; पण ह्या दुसऱ्या पिल्लाचीही जीवनयात्रा संपू नये, म्हणून मी ते पिल्लू माझ्या ताब्यात घेतलं. तसं मोराचं हे पिल्लू स्वत:चं रक्षण करायला समर्थ होतं. त्याला रात्री सुरक्षित राखण्यासाठी मला काही विशेष काळजी घेण्याची गरज पडली नाही. दिवसभर स्वयंपाकघराजवळील शेडमध्ये किंवा बाबांच्या खोलीबाहेरच्या व्हरांड्याच्या आसपास ते राहात असे. संध्याकाळ झाली की, जवळच्याच झाडाच्या खालच्या फांदीवर उडी मारून, वरच्या खोडाच्या व फांदीच्या बेचकीत जाऊन ते सुरक्षितपणे रात्र घालवत असे. मला कुणीतरी सांगितलं की, मोराची झपाट्यानं वाढ होण्यासाठी त्याला उधईचा लार्व्हा द्यायला हवा. उधई आणि लार्व्हा मोराचं आवडतं खाद्य आहे. मग मी एकदोन दिवसाआड टिकम आणि लोखंडी तगारी वा घमेलं घेऊन तवागोंदीच्या भोवतालच्या जंगलात जात असे. तसाही तवागोंदीच्या आसपासच्या जंगलाच्या तो भाग माझ्या ओळखीचा झाला होता. संधी मिळाली की जंगलात भटकायचा नादच लागला होता मला. त्यामुळे उधईची मोठाली वारुळं कुठे आहेत हे मला माहीत होतं. तसं हे सोमनाथचं जंगल म्हणजे ताडोबा सँक्युअरीच्या जंगलाशी जोडलेलंच जंगल होतं.

आणि हे जंगलानं व्याप्त क्षेत्र म्हणजे सपाट भूभाग नव्हता तर लहान छोट्या टेकड्या आणि घळ्यांनी व्यापलेलं, लहान मोठ्या नाल्यांनी जोपासलेलं होतं. एकदा मी नकळत बराच आत घुसलो होतो आणि वाट चुकून बराच भरकटलो होतो. जंगलात हरवण्यात देखील एक थरार असतो ह्याचा अनुभव मला प्रथमच आला होता. हा थरार परत परत मिळवण्याचं व्यसनच मला लागलं होतं, पण त्याबद्दल चर्चा इथे नको.

तर वारुळातील मोराचं आवडतं खाद्य मिळवताना मी उधईचं सर्वच वारुळ नष्ट होऊ नये ह्याची काळजी घेत असे. उधईच्या वारुळाच्या कोणत्या भागात उधईची अंडी असावीत ह्याचा अंदाज घेऊन मी तोच भाग फोडत असे. आणि आत मातीच्या भिंतींनी तयार केलेल्या सुरक्षित पोकळीतील मेंदूसारखा दिसणारा, काहीसा मधाच्या पोवळ्यासारखी रचना असलेला, पण मऊ असलेला, लार्व्हाचा भाग घमेल्यात जमा करीत असे. घमेलं डोक्यावर वा खांद्यावर घेऊन येताना लार्व्हाची निगराणी करणारे उधई कीटक माझ्या मानेला चावण्याची भीती वाटे. मी घमेलं घेऊन येताना दिसल्याबरोबर मोराचं हे पिल्लू माझ्याकडे धावत येत असे. मी दिलेल्या मेजवानीवर तुटून पडत असे. त्यामुळे हा दोस्त माझी वाट पाहत थांबलेला असे. तो आपल्या स्वार्थी हेतूसाठी थांबलाय हे माहीत असूनही मला त्याला वा तिला पाहिलं की एक आनंदच लाभत असे. ह्या खाद्यामुळे पिलाची वाढ झपाट्यात होऊ लागली. त्याच्या सर्वांगातून उगवलेल्या पिसांच्या कोंबांमुळे काही काळ पिल्लू एखाद्या साळीसारखं म्हणजे कुरूपच दिसत असे. पिल्लू मोठं होत गेलं आणि आमची चांगली दोस्ती जमली. मी दुपारी जेवण झालं की, आम्ही बाबांच्या खोलीबाहेरील व्हरांड्यात पेपर वाचायला बसायचो काही वेळ, तेव्हा ते माझ्याभोवती फिरत असे. कधी लहर आली तर उडी मारून माझ्या मांडीवरही बसत असे. कधीमधी अंगावर टोचही मारत असे. काही काळ हे पिल्लू मादी आहे की नर अशा शंकेनं मी अस्वस्थही होत असे. त्याच्या अंगावर वाढत चाललेल्या पिसांनी विशेषत: शेपटीच्या बाजूच्या पिसांनी आकार घ्यायला सुरुवात केल्यावर तो नरच असल्याचे सहजच लक्षात येऊ लागले.

एकदा इतक्या जोरात तो माझ्या मांडीवर आदळल्यासारखा उतरला की मी कळवळून ओरडत एकदम उभा राहिलो आणि तो पायाखाली अपेक्षित आधार न मिळाल्याने जमीनीवर वाकडा तिकडा पडला. आम्ही दोघांनीही स्वत:ला सावरलं. ही अशी प्रतिक्षिप्त प्रतिक्रिया मी द्यायला नको होती, असं वाटून मी त्याला चुचकारण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यानं त्यानंही स्वत:ला सावरलं होतं. अंगाचा थरथराट करून सगळी पिसं जागेवर आणली होती. माझ्या चुचकारण्याकडे दुर्लक्ष करून,

(पृ.१३ वर...)

# कुठे शोधीशी रामेश्वर अन् कुठे शोधीशी काशी
# हृदयातील भगवंत राहिला हृदयातून उपाशी

किती खरं आहे हे! देव शोधण्यासाठी नव्हे नवस करण्यासाठी, ते फेडण्यासाठी आपण देव शोधत अगदी डोंगरमाथ्यावरपण जातो. देवळाचे विश्वस्त पण पैशासाठी आपला देव नवसाला पावतो असा डांगोरा पिटतात आणि मग तिथे भक्तांची रीघ लागते. मग त्या भक्तांसाठी मंदिराचा जीर्णोद्धार करणे, लोकांसाठी पार्किंगची, खाण्यापिण्याची सोय करणे, गाड्या वरपर्यंत नेण्यासाठी पूर्वी असलेल्या पायवाटेचा मोठा रस्ता करणे हे उद्योग सुरू होतात. आणि खेदाची गोष्ट म्हणजे हे सर्व करताना कोणीही पर्यावरणाचा विचार करत नाही.

असेच एक सुंदर, निसर्गसंपन्न अशा डोंगरावर वसलेले शंकराचे पुरातन मंदिर आमच्यापासून जवळच असलेल्या तुंगारेश्वरच्या डोंगरावर आहे. (प्रसिद्ध तुंगारेश्वरच्या अभयारण्यात हा डोंगर येतो. ता. वसई, जि. पालघर)

पंचवीस वर्षांपूर्वी मी जेव्हा प्रथम त्या मंदिरात गेले तेव्हा पायथ्यापासून मंदिरापर्यंत आम्ही एका छोट्या पायवाटेने गेलो. पायवाट गर्द झाडीतून जात होती, आजूबाजूला निरनिराळ्या फळा-फुलांनी भरलेली झाडे होती त्याचप्रमाणे औषधी झाडे, मोठमोठे वृक्ष, लता-वेली या सर्वांनी तो परिसर हिरवागार होता. उन्हाळा असूनही वातावरण आल्हाददायक होते व त्यामुळे बऱ्यापैकी उंचीवर असणाऱ्या मंदिरात कधी पोहचलो ते कळलेच नाही.

मंदिर छोटेसेच पण सुबक होते. मंदिराच्या बाजूनेच स्वच्छ पाण्याची नदी वहात होती. गर्द झाडीचा तो परिसर खूपच शांत, रमणीय होता. देवदर्शन घेतल्यानंतर सोबत घरून नेलेला फराळ केला, नदीचे स्वच्छ, थंड पाणी प्यालो व मंदिराभोवतीच्या परिसरात फिरायला गेलो. फिरताना वेगवेगळ्या प्रकारचे पक्षी सहजच दिसत होते. खंड्या पाण्यात सूर मारून मासे पकडीत होता.सुतार पक्ष्याच्या झाडामधे घरटे बनवण्याचा आवाज स्पष्ट ऐकू येत होता. तांबट पक्ष्याचा कॉल जंगलात घुमत होता. मोठ्या झाडांच्या ढोलीत घुबडे विसावली होती. छोट्या पक्ष्यांपासून मोठ्या पक्ष्यांपर्यंत तसेच निरनिराळे किडे-कीटक, फुलपाखरे असे बरेच काही आम्हाला तिथे दिसले. जंगलातून करवंद, जांभळं असा रानमेवा जमा करून आम्ही तृप्त मनाने घरी परतलो. निसर्गाच्या पावित्र्याला कुठल्याही प्रकारे धक्का न लावता आमचे देवदर्शन झाले होते.

मधे बराच काळ गेला. मंदिर व परिसराचा कायापालट करण्यात आला आहे असे कळले. आणि तो बघण्यासाठी परत तुंगारेश्वरला जाण्याचा योग जुळून आला. देवळापर्यंत गाडीरस्ता झाल्याने चालायला कोणीच तयार नव्हते. गाडीने वरपर्यंत जाताना झालेला बदल जाणवत होता. आजूबाजूचे जंगल विरळ झालेले दिसत होते. वरती गाडी पार्किंगलॉटमध्ये ठेवली. देवळाच्या वाटेवर असणाऱ्या खाद्यपदार्थ विक्रेते, गंडेदोरे विक्रेते यांच्याकडे बरीच गर्दी होती. जीर्णोद्धाराच्या नावाखाली सुबक मंदिराचा वेडावाकडा व बेढब विस्तार केला होता. सर्व भक्तांना आकर्षित करण्यासाठी निरनिराळ्या देवदेवतांची मंदिरे बांधली होती. मंदिराच्या बाजूने वाहणाऱ्या नदीत खूप कचरा पडला होता. त्याची दुर्गंधी येत होती. पाणी खराब झाले होते. माणसांची खूप वर्दळ होती. एक कुटुंब पितरांसाठी करण्याच्या कार्यात जोरजोरात टाळ्या बडवत होते. त्याचा भयंकर कर्णकर्कश आवाज येत होता. पूर्वीची शांतता, शीतलता, प्रसन्नता नावालाही नव्हती. अशा वातावरणात शांतताप्रिय, लाजरे बुजरे पक्षी कुठून दिसणार? फक्त खूप प्रमाणात कावळे होते व त्यांची कर्कश काव-काव चालू होती. व्यापारीकरणाने एका सुंदर, निसर्गसंपन्न अधिवासाचा घास घेतला होता. बघून मन विषण्ण झाले.

आपल्या पूर्वजांनी निसर्गसंवर्धनाची गरज ओळखून निसर्गाची जपणूक सामान्य, अशिक्षित लोकांकडून करण्यासाठी त्याला हुशारीने धर्मात गोवले; पण आताच्या सुशिक्षित लोकांकडून निसर्गरक्षण बाजूला सारून फक्त अंधश्रद्धा तेवढी अंगिकारली जाते. निरनिराळ्या कारणांसाठी जमिनीवरील निसर्गसंपदेचा मानवाने घास घेतला. त्याचप्रमाणे देवदर्शनासाठी जमिनीवर मोठमोठी मंदिरे बांधली, मग तेच देवदर्शन घेण्यासाठी डोंगरावर जाण्याची काय गरज? मुक्या पशूपक्ष्यांना अधिवासासाठी डोंगर, टेकड्या तरी आपण सोडल्या पाहिजेत. स्वार्थी मनुष्यप्राण्याने स्वत:च्या स्वार्थासाठी, स्वत:च्या अस्तित्वासाठी तरी एवढं केलं पाहिजे. नाही का?

– रेश्मा गाळवणकर

## स्वागत नव्या सभासदांचे (१ जुलै २०१८ ते १८ सप्टेंबर २०१८)

| क्र. | नाव | जिल्हा | फोन नं. | e-mail |
|---|---|---|---|---|
| १०६२ | प्रा. डॉ. उमेश रा. कनेरकर | अमरावती | ९९२३४७५०५३ | unmessh@gmail.com |
| १०६३ | श्री. तुषार रमेश नारखेडे | नाशिक | ९८२३२४००३२ | trnarkhede17@gmail.com |
| १०६४ | श्री. चंद्रशेखर अं. खेरोडकर | नवी मुंबई | ९२२२३३४९६६ | kherodkar@gmail.com |
| १०६५ | प्रा. डॉ. श्रीकांत वडाळ | अमरावती | – | - |
| १०६६ | श्री. अभिरथ के. मोहाडीकर | अमरावती | – | - |
| १०६७ | श्री. अराध्य मनीष गायकवाड | अमरावती | | - |

# मला असं वाटतं. तुम्हाला?

कॅमेरा, नजर आणि सर्जनशीलता या तीन गोष्टींचा एकत्रितपणे संगम साधता आला की तयार होतं ते उत्तम छायाचित्र. प्रत्येक छायाचित्र काही ना काही संदेश आपल्याला देत असतं, फक्त ते पाहण्याचा दृष्टिकोन आपल्याकडे असायला हवा. प्रत्येक छायाचित्रकाराचा त्या वस्तूकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. आणि यातूनच काहीतरी नवीन करण्याची संधी भेटत असते.

मी आणि माझे मित्र मंडणगडला पक्षी निरीक्षणासाठी जात असताना अगदी मंडणगडच्या जवळच रस्त्यामध्ये आम्हाला भारद्वाज पक्षी मृत अवस्थेमध्ये सापडला. आम्ही तिघे पक्षीप्रेमी असल्याने त्याला पाहिल्यानंतर लगेच गाडी थांबवली. ते दृष्य मी कॅमेऱ्यात टिपून घेतले आणि त्याला उचलून बाजूला ठेवले.

असाच आणखी एक प्रसंग आमच्यासोबत केरळला घडला होता. आम्ही पक्षी निरीक्षणासाठी एका अभयारण्याला भेट देण्यासाठी चाललो होतो. परतीच्या वेळी आम्हाला रस्त्यामध्ये 'सर्पगरुड' निपचित पडलेला दिसला. एवढा मोठा पक्षी रस्त्यात पडलेला पाहून आम्ही चकित झालो. तो नक्की कशामुळे मरण पावला असावा याचा काहीच अंदाज बांधता आला नाही. त्याच्या शरीरावर कुठेच कसलेच घाव दिसत नव्हते. आमच्याकडे शेवटी त्याला उचलून नेण्यापलीकडे काहीच पर्याय नव्हता. त्याला उचलून आम्ही बाजूला ठेवले आणि पुढे निघालो.

आणखी एक प्रसंग सांगायचा म्हणजे आम्ही तिघे हर्णेला फिरायला गेलो असता आम्हाला एक माकड रस्त्यात चिरडलेला दिसला. आमच्या डोळ्यांनी बघता येत नव्हतं इतकं वाईट पद्धतीने त्याला कुणीतरी चिरडलं होतं. मी त्याला उचलून बाजूला ठेवले, आणि महत्त्वाचं म्हणजे मी हे करत असताना एकाने मला विचारलं सुद्धा की तुम्ही मारलं का याला? मी सगळं टाळून त्याला बाजूला ठेवून त्याचं छायाचित्र काढून निघून गेलो.

या तिन्ही दृश्यांमधून एकच संदेश पुढे येत होता, तो म्हणजे वाढते शहरीकरण आणि आधुनिकता या दोन्हींचा प्राणी आणि पक्षी यांवर खूप वाईट परिणाम होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे वाहनांची संख्या वाढत चालली आहे आणि त्याबरोबर त्यांचा वेगसुद्धा. त्याचा परिणाम फक्त माणसालाच नाही तर संपूर्ण निसर्गसृष्टीला जाणवत आहे. दररोज कितीतरी प्राणी आणि पक्षी गाडीखाली येऊन मृत पावत आहेत. त्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

'भारद्वाज', 'सर्पगरुड' आणि 'माकड' यांचे छायाचित्र टिपण्यामागचा माझा दृष्टिकोन एवढाच होता की त्यांचं संरक्षण. त्यांच्या छायाचित्रणामुळेच माझ्यात त्यांच्याबद्दल आपुलकी निर्माण झाली. त्यांना वाचवण्याची जाणीव निर्माण झाली. त्यामुळे मला तरी असं वाटतं की प्रत्येक छायाचित्र आपल्याला काहीतरी नवीन करण्याची संधी देतं.

– तुषार भोईर

**टपाल तिकिटांच्या दुनियेत –**

# चित्र बलाक (Painted Stork)

चित्र बलाक हा करकोचा कुलातील मोठा पाणपक्षी आहे. हा मुख्यत: सखल प्रदेशातील पाणथळीवर थव्याने आढळून येतो. हे पक्षी नदी, तळी व बंधाऱ्याच्या पाणपसाऱ्याच्या संथ पाण्यामध्ये थव्याने भक्ष्य शोधण्यासाठी फिरत असतात. ते आपली मोठी चोच अर्धी उघडी ठेवून पाण्यामध्ये खुपसतात व आजूबाजूला फिरवत लहान माशांचे भक्ष्य शोधत असतात. कधी खेकडे तर क्वचित चक्क सापदेखील खाऊन टाकायला त्यांना आवडते.

या पक्ष्याची उंची तीन ते सव्वा फूट असल्याने दुरूनही तो सहज दृष्टीस पडतो. चित्र बलाकाच्या पंखावर नाजूक पट्टेरी नक्षी रेखाटलेली आहे व त्याच्या शेपटीला गुलाबी रंगाची झाक असते. याची लांबसर मजबूत चोच पिवळ्या रंगाची असते. डोके लालसर रंगाचे अन् बोडके म्हणजे पिसेविरहीत असते. पाय गुलाबी रंगाचे असतात.

इतर पाणपक्ष्यांच्या सोबतच ते मोठ्या सुरक्षित झाडांवर आपली घरटी बांधतात ती सामूहिकपणे. घरट्यांवर त्यांचा बारीक आवाजात कण्हण्याचा व चोचीच्या खडखडाटाचा आवाज ऐकू येतो. या पक्ष्यांच्या विष्ठेने झाडांच्या फांद्या व खालची जमीन पांढरी झालेली दिसते. या सुंदर लक्ष्याची पिले मात्र मातकट रंगाची अनाकर्षक असतात. चोचीतून आणलेले ताजे मासे मिळविण्यासाठी भावंडांमध्ये चढाओढ असते.

पूर्वेकडील राज्ये वगळल्यास सर्वत्र चित्र बलाक राहतात. भरतपूर अभयारण्य, रंगनथिट्टू, कोकरे बेलूर, भिगवण जलाशय इत्यादी जलाशयांवर थंडीच्या दिवसात पहावयास मिळतात. एखाद्या नितळ पाण्याने भरलेल्या तलावाकाठी उभा असलेला चित्र बलाकाचा थवा सूर्योदयाच्या समयी पहावयास मिळाला की, मन प्रसन्न होते.

भारतीय टपालखात्यातर्फे एप्रिल २००० साली नियमित टपाल तिकिटाच्या मालिकेत चित्र बलाक या पक्ष्यावर ४ रुपयांचे तिकीट प्रकाशित झाले आहे.

– रवींद्र वामनाचार्य
*मोबाईल : ९८९०३९०५२७,*
*इ-मेल : r_wamanacharya@yahoo.co.in*

# वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. २३ नोव्हेंबर २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजता यशवंतराव चव्हाण स्मृती सदन (टाऊन हॉल) बस स्टँड जवळ, कराड, जि. सातारा येथे ३२ व्या महाराष्ट्र राज्य पक्षीमित्र संमेलनादरम्यान आयोजित करण्यात आली आहे. तरी संस्थेच्या सर्व सन्माननीय आजीवन सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय :**

१. मागील ठाणे येथे दि. २५ नोव्हेंबर २०१७ ला पार पडलेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. संस्थेचा मागील वर्षीचा (२०१७-२०१८) जमाखर्च, अहवाल व ताळेबंद यास मंजुरी देणे.

३. आगामी वर्षभरातील (२०१९-२०२०) कार्यक्रमांची रूपरेषा ठरविणे.

४. सन २००१८-२०१९ व २०१९-२०२० सालच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.

५. सन २००१८-२०१९ सालासाठी सनदी हिशेब तपासनीस ठरविणे.

६. मा. अध्यक्षांच्या परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

ठिकाण : अमरावती
दि. ०१/१०/२०१८

डॉ. जयंत वडतकर
अध्यक्ष, महाराष्ट्र पक्षीमित्र.

सूचना :

गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास, सभेच्या कामास सभेच्या नियोजित वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी सुरुवात करण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. आणि मूळ सभेपुढे विचारासाठी आलेल्या सर्व कामांचा व विषयांचा विचार करण्यात येईल.

# ३२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन

कराड जिमखाना आणि सहयोगी संस्था यांच्या आयोजनाने २३ व २४ नोव्हेंबर १८ रोजी कराड येथे हे संमेलन होत आहे.

ज्यांना शोधनिबंध सादर करावयाचे असतील त्यांनी ते ३० ऑक्टोबरपर्यंत कराड जिमखाना यांच्याकडे पाठवावेत.

पत्ता : ४१६ सोमवार पेठ, कराड, जि. सातारा ४१५११०, फोन : ०२१६४ - २२००४१, email : karadgymkhanakarad@gmail.com

नोंदणी-पत्रक सोबत आहे.

महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन,
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ- नागपूर, महाराष्ट्र वन विभाग - नागपूर,
महाराष्ट्री व्याघ्र प्रकल्प - कोल्हापूर व कराड जिमखाना, कराड आयोजित
२ रे अखिल भारतीय व ३२ वे महाराष्ट्र
**पक्षीमित्र संमेलन, कराड**
(२३ व २४ नोव्हेंबर २०१८)

Maharashtra Pakshi Mitra's
2nd All India & 32nd Maharashtra State
**PAKSHI MITRA SAMMELAN**
(23 & 24 Nov. 2018)
Organiser : Karad Gymkhana, Karad
Co Organisers : Maharashtra State Biodiversity Board - Nagpur,
Maharashtra Forest Department - Nagpur,
Sahyadri Tiger Reserve - Kolhapur

**REGISTRATION FORM**

| FIRST NAME | MIDDLE NAME | SURNAME |
|---|---|---|
| | | |

ADDRESS | Mobile No.

Male | Female | AGE IN YEARS | E-MAIL ID

| | Till 31 Oct 2018 | From 1st Nov 2018 As Well As Spot Registration | Particulars |
|---|---|---|---|
| Registration Without Accommodation | ₹. 800 | ₹. 1000 | The Fees Includes Attendance At Sammelan Sessions, Sammelan Kit, Breakfast, Lunch-2, & High Tea On Two Days (23rd & 24th) Of The Sammelan. |
| Registration With Accommodation | ₹. 1000 | ₹. 1200 | **Common Shared Accommodation For a Limited 200 Participants On 'First Come First Serve Basis' Is Available** + The Fees Includes Attendance At Sammelan Sessions, Sammelan Kit, Breakfast, Lunch-2, & High Tea On Two Days (23rd & 24th) Of The Sammelan. |
| Field Trip Attending Yes ☐ No ☐ Field Trip Preference any One of Below 1) Koyna Ramban Trek ☐ 2) Chandoli Zolambi Trek ☐ | ₹. 650 | | Fees Includes 24th Night Dinner & 25th Morning Breakfast, Tea, Lunch, High Tea, Traveling To & Fro From Karad To Karad By Bus & Forest Entry Fees |
| **Total Payable Amount** | | | |

**FOR PAYMENT BY RTGS/NEFT**

| Name of Bank From Payment was done | Name of Account Holder from where Payment was made | Date of Payment | Transaction/UTR Number |
|---|---|---|---|
| | | | |

**FOR PAYMENT BY DD/CHEQUE**

| DD / CHEQUE NUMBER | DATE | Name of Bank and Branch |
|---|---|---|
| | | |

Cheques may be Deposited at any branch of Corporation Bank in your locality and Send images of Deposited slip to us.

**OUR BANK DETAILS**

- A/c Name : KARAD GYMKHANA
- BANK Name : CORPORATION BANK,
- Branch : Ratnakalyan, 286/5/6 Budhawar Peth, Karad 415 110
- A/c No : 520101252590297
- A/c Type : Savings Bank A/c
- IFSC Code : CORP0001279
- MICR CODE : 415017352
- DD/Cheque to Be Made In Favour of : KARAD GYMKHANA
- Payable at : KARAD

**Signature**

■ NOTE : REGISTRATION WILL BE CONFIRMED ONLY ARTER RECEIPT OF PARTICIPATION FEE ■ (Please TICK ✓ Appropriate Box)

You May Upload Image of This Form to-karadgymkhanakarad@gmail.com OR
Send the Form by Post/ Courier Along with Payment to Below Address

ORGANIZERS :

**KARAD GYMKHANA** : 416, Somwar peth, Karad, Dist. Satara - 415110
02164-220041, 9822034457, 94220004800,
karadgymkhanakarad@gmail.com, rohanbhate@gmail.com
KARAD GYMKHANA www.karadgymkhana.com

# नाच रे मयुरा

(पृ.१० वरून...)

माझ्याकडे एक तीव्र नाराजीचा कटाक्ष टाकून तो डौल आणि तोरा सांभाळत पण जरा वेगानंच माझ्यापासून दूर गेला आणि पायऱ्या उतरून दूर निघून गेला. त्याला अपमानास्पद वाटणं स्वाभाविक होतं. त्यानंतर एकदोन दिवसातच मी काही दिवसांकरता मुंबईला गेलो. परत आलो तर त्यानं आपल्या मुक्कामासाठी रूपाच्या (वाघीणीच्या) पिंजऱ्याजवळील झाड निवडलं होतं आणि जमीनीवर उतरणं वा व्हरांड्यात येणं एकदमच कमी केलं होतं. डोक्यावरील तुऱ्यामुळे आणि बाकदार उंच मानेमुळे मोर डौलदार दिसत असला तरी त्याचा मेंदू आकारानं लहानच असतो. बहुधा त्यामुळे त्याची स्मृती दीर्घकाळ टिकत नसावी. कारण काही असो, मी आता त्याच्या दृष्टीनं इतरांपेक्षा वेगळा नव्हतो.

– दिनानाथ मनोहर

बक्षिसे

पहिले पारितोषिक - रु. ३१०००/-

दुसरे पारितोषिक - रु. २१०००/-

तिसरे पारितोषिक - रु. ११०००/-

५ उत्तेजनार्थ पारितोषिके - रु. ५०००/-

'महाराष्ट्र पक्षीमित्र' संयोजित,
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ- नागपूर, महाराष्ट्र वन विभाग - सातारा,
सह्याद्री व्याघ्र राखीव - कोल्हापूर व कराड जिमखाना, कराड आयोजित

## २ रे अखिल भारतीय व ३२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन, कराड

(२३ व २४ नोव्हेंबर २०१८)

छायाचित्रे पाठविण्याची शेवटची तारीख ३० ऑक्टोबर २०१८

# राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धा

## (फोटोग्राफी स्पर्धा)

**स्पर्धेसाठी विषयः- भारतीय पक्षी***

एका छायाचित्रासाठी रु. १०० हे शुल्क असेल. जास्तीत जास्त ५ छायाचित्रे तुम्ही पाठवू शकता.
स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुढील वेबसाईटला भेट द्या. www.karadgymkhana.com




'महाराष्ट्र पक्षीमित्र' संयोजित,
महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ- नागपूर, महाराष्ट्र वन विभाग - सातारा,
सह्याद्री व्याघ्र राखीव - कोल्हापूर व कराड जिमखाना, कराड आयोजित

२ रे अखिल भारतीय व ३२ वे महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन, कराड

(२३ व २४ नोव्हेंबर २०१८)

राष्ट्रीय छायाचित्र स्पर्धा

(फोटोग्राफी स्पर्धा)

### नियम व अटी

**पूर्व पात्रता निकष :**

- स्पर्धेसाठी विषय :- भारतीय पक्षी (बंदिस्त पक्षांचे छायाचित्रे पात्र नाहीत.)
- प्रत्येक छायाचित्रकार जास्तीत जास्त ५ छायाचित्रे पाठवू शकतो.
- छायाचित्रे स्वीकारण्याची अंतिम दिनांक ३० ऑक्टोबर २०१८ असेल.
- निवडक छायाचित्रांना प्रदर्शनामध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
- कोणत्याही सबबीखाली एकदा भरलेले पैसे परत दिले जाणार नाहीत
- स्पर्धेचा निकाल संमेलनाच्या दिवशी म्हणजे २३-२४ नोव्हेंबर २०१८ रोजी जाहीर करण्यात येईल.
- विजयी स्पर्धकांना पूर्वकल्पना देऊन बक्षीस वितरण समारंभासाठी निमंत्रित केले जाईल.
- निवडक छायाचित्रांचे प्रदर्शन संमेलन स्थळी भरविण्यात येईल.
  परिक्षकांनी दिलेला निर्णय अंतीम राहील.
- स्पर्धे बद्दलचे सर्व हक्क समितीकडे असतील व समितीचा निर्णय हा अंतिम असेल.

**छायाचित्रे कशी पाठवाल :**

- **स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुढील वेबसाईटला भेट द्या. www.karadgymkhana.com**
- छायाचित्रे १२' X १८' आकाराची (१ ते ५ एमबी व ३०० डी. पी. आय.) JPEG फॉर्मेटमध्ये असावीत व त्यावर बॉर्डर, सही किंवा नाव असे काही लिहिलेले नसावे.
- कॅमेरा ट्रॅप, एच.डी. आर. व पॅनारोमा छायाचित्रे ग्राह्य धरली जाणार नाहीत.
  छायाचित्रे पाठविण्याची शेवटची तारीख ३० ऑक्टोबर २०१८ असेल.

**छायाचित्रातील बदल :**

- छायाचित्रामध्ये कमीत कमी बदल केलेले असावेत. शार्पनेस, क्लिनिंग, कलर, कॉन्ट्रास, ब्राईटनेस हे बदल चालू शकतात.
- छायाचित्रातील कोणताही भाग काढून टाकणे, किंवा दोन छायाचित्रे जोडणे चालणार नाही.
- निवड झाल्यास तुमच्याकडून मूळ छायाचित्र (RAW फाईल व मोठ्या आकाराचे छायाचित्र) मागवून घेण्यात येऊ शकेल.

**छायाचित्राचे हक्क :**

- पाठविलेलेले छायाचित्र हे तुमच्या स्वत:चे असले पाहिजे. कोणी दुसऱ्याने काढलेले किंवा दुसऱ्या संस्थेचे मालकत्व असलेली छायाचित्रे पाठवू नयेत.
- छायाचित्राचे सर्वाधिकार (Copyright) व वापर :
  जिंकलेल्या छायाचित्रांचे सर्वाधिकार हे छायाचित्रकाराकडेच असतील.
- कराड जिमखाना, कराड या छायाचित्रांचा वापर प्रबोधनपर कार्यक्रम, वर्तमानपत्रे, जाहिरात अशा इतर काही माध्यमातून करु शकेल, यात छायाचित्रकाराचे नाव छापले जाईल.

**एका छायाचित्रासाठी रु. १०० हे शुल्क असेल. जास्तीत जास्त ५ छायाचित्रे तुम्ही खालील अकौंट वर पाठवू शकता.**

- A/c. Name : KARAD GYMKHANA
- Savings A/c. No : 520101252590297
- BANK Name : CORPORATION BANK
- Branch : Karad
- IFSC Code : CORP0001279
- MICR CODE : 415017352

- DD/Cheque to Be Made In Favour of : KARAD GYMKHANA
  Payable at : KARAD (M.S.)

# महाराष्ट्र पक्षीमित्रचे

## आजच सभासद व्हा

आजीवन सभासद शुल्क रु ५००/–

आपण सभासद असाल तर अजून एक तरी सभासद नोंदवा.

### सभासद कसे व्हाल ?

१) डी.डी/मनीऑर्डर, ''महाराष्ट्र पक्षीमित्र'' या नावे अमरावती. येथे देय असलेला असावा.

२) Core Bank System नेही पैसे पाठवू शकता.
बँकेचे नाव : बैंक ऑफ महाराष्ट्र, गाडगे नगर, अमरावती.
खात्याने नाव : महाराष्ट्र पक्षीमित्र,
बँक खाते नं. : ६००३६८१२०१७
IFSC Code - MAHB0000639
खात्यात पैसे भरून त्वरीत मेलने कळविणे, तसेच सभासदाचा अर्ज भरून पोस्टाने पाठवणे अत्यावश्यक आहे. सोबत पे–इन स्लीपची झेरॉक्स जोडावी.

३) पत्रव्यवहाराचा पत्ता :– महाराष्ट्र पक्षीमित्र, द्वारा डॉ.गजानन वाघ अरण्यार्पण, ६३ समता कॉलनी, कठोरा रोड, अमरावती ४४४६०४

Email : pakshimitra@gmail.com
Phone No. : 0721 - 2552334
Website : www.pakshimitra.org

### त्रैमासिक अंक निधी

महाराष्ट्र पक्षीमित्र संस्थेचे मुखपत्र त्रैमासिक अंक पक्षीमित्र हा आपण दर तीन महिन्यांनी प्रकाशित करत असतो. या अंकाला छपाई व पोस्टेज मिळून वार्षिक ३५,०००/– ते ४०,०००/– रुपये खर्च येतो. संस्थेचे नियमित उत्पन्न काहीच नाही त्यामुळे हा अंक परवडत नाही, पक्षीमित्र संस्थेच्या व पक्षी संवर्धन संरक्षण कार्यात या अंकाची अत्यंत आवश्यकता आहे. याचसाठी हा अंक असाच चालू ठेवा असे वार्षिक सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले आहे. याच्या खर्चासाठी त्रैमासिक अंक निधी उभा करण्याचे ठरविण्यात आले आहे. आपण सुध्दा या अंकासाठी देणगी देऊन हातभार लावावा ही नम्र विनंती.

संस्थेच्या प्रकल्पाला आपण सुद्धा देणगी देऊन हातभार लावावा ही विनंती.

# महाराष्ट्र पक्षीमित्र

(संस्था रजि. नं. महा/२८५/९८/नागपूर)

## सभासद अर्ज

प्रति,

मा.अध्यक्ष,

महाराष्ट्र पक्षीमित्र

महोदय,

मला महाराष्ट्र पक्षीमित्र, नागपूर नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/२८५/९८/नागपूर या संस्थेचे नियम व उद्दिष्टे मान्य आहेत. मी शपथपूर्वक सांगतो की, मी सर्व नियमांचे कोटेकोरपणे पालन करीन. मी वरील संस्थेचा आजीवन सभासद होऊ इच्छितो. माझा व्यक्तिगत तपशील खालील प्रमाणे आहे.

संपूर्ण नाव : _____

संपूर्ण पत्ता : _____

_____

फोन नं. _____ मो. _____

ई–मेल _____

जन्मतारीख : _____

शिक्षण : _____

नोकरी/व्यवसाय : _____

छंद : _____

माझी वर्गणी सोबत देत आहे (D.D./Money Order / Core Bank System)

कृपया माझी सभासद म्हणून स्वीकृती व्हावी ही नम्र विनंती.

श्री/श्रीमती _____ यांनी सुचविल्यावरुन सभासदत्व घेत आहे.

दिनांक

**अध्यक्ष**

आपला

**अर्ज मंजूर/नामंजूर**

**महाराष्ट्र पक्षीमित्र**

सही

**महाराष्ट्र पक्षीमित्र ला देण्यात येणाऱ्या सर्व देणग्या 80 G अन्वये सवलत पात्र आहेत.**

**उपक्रम –**

# चिमणी-स्थितींचे तालुका सर्वेक्षण

पारनेर येथील आपले एक सभासद रावसाहेब कासार यांनी तालुक्यातील चिमण्यांची परिस्थिती जाणून घेण्याकरता एकंदर १३१ गावांपैकी १२२ गावांना भेट देऊन ५२५३ ग्रामस्थांना भेटून प्रश्नपत्रिका भरून घेऊन माहिती जमा केली व त्यावर आधारित एक अहवाल तयार केला.

हे सर्वेक्षण करण्यासाठी त्यांनी जवळ जवळ अडीच वर्षे कधी पायी, कधी मोटर सायकलने, तर कधी बसने प्रवास करून शनिवार, रविवार व सुटीच्या दिवसात हे काम झपाटल्यासारखे एक हाती केले. चिमण्यांची घटत चाललेली संख्या रोखण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत. त्यात नागरिक, सेवासंस्था, सरकारी कार्यालये यांच्यासाठी काही उपक्रम सांगितले आहेत, त्यांचा आवाका मोठा आहे. पण त्यांनी श्री. कासार यांनी व्यक्तिश: केलेल्या कामाला प्रतिसाद दिला तर त्यांचा हेतू साध्य होऊ शकेल.

श्री. कासार यांच्या मेहनतीला दाद द्यावी तेवढी थोडीच आहे.

**आपण लिहिता –**

पक्षीमित्रचा अंक आल्यावर तुम्ही भेटल्याचा आनंद होतो. पक्षीमित्र संघटनेच्या घडामोडी कळतात.

ज्येष्ठ पक्षीमित्र विजयकुमार आंबेडकर गेल्याचे अंक वाचल्यावर कळाले. अतिशय वाईट वाटले. दु:खद घटना घडली.

पक्षीमित्र हा महाराष्ट्रातील सर्व पक्षी अभ्यासकांचा दुवा आहे. तुमच्या चिकाटीच्या प्रयत्नाने, संपादन कौशल्याने अंकाचे प्रकाशन सातत्याने होत आहे, त्याबद्दल आभार!

– बी. एस. कुलकर्णी, सोलापूर.

Book Post

प्रती,

प्रेषक :

**महाराष्ट्र पक्षीमित्र**
६३, अरण्यार्पन, समता कॉलनी,
कठोरा रोड, अमरावती.
४४४६०४
*E-mail : pakshimitra@gmail.com*
*website : www.pakshimitra.org*

**पक्षीमित्र**
संपादक : दिगंबर गाडगीळ
मूल्य ₹ ५/-
मासिकात व्यक्त केलेल्या विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
अक्षरजुळणी : प्रिंटवेब, नाशिक
मुद्रक : गुरुदेव प्रिंटर्स, बिमवी रोड, अमरावती